सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२
Ph. :0253-2231479 http://ycmou.ac.in , http://ycmou.digitaluniversity.ac
e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

ज्ञानगंगा घरोघरी

## परीक्षा विभाग

जा.क्र. : परीक्षा /हिवाळी २०२२-२३/२३३ दिनांक : १७/११/२०२२

## सूचनापत्र

## पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

सूचनापत्र जा.क्र. परीक्षा/डिसेंबर २०२२/ दिनांक २१/१०/२०२२ अन्वये १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक (PRN) असलेल्या सर्व पुनर्परीक्षार्थींनी संबंधित शिक्षणक्रमांच्या पुनर्परीक्षेसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज **रु.१००/- विलंब शुल्कासह** भरण्याची मुदत दिनांक १२/११/२०२२ पर्यंत देण्यात आली होती. दिनांक १२/११/२०२२ रोजी रात्री १२.०० वा. परीक्षा अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात आली होती.

मात्र पुनर्नोंदणी केलेल्या तसेच नियमित विद्यार्थी व अभ्यासकेंद्रांच्या मागणीवरून ही मुदत **दिनांक १८/११/२०२२ ते २७ नोव्हेंबर २०२२** अशी वाढविण्यात येत आहे. यानंतर कुठल्याही कारणास्तव मुदतवाढ मिळणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१) सर्व शिक्षणक्रमांच्या पूर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठीचे शुल्क खालीलप्रमाणे राहील.

i. प्रमाणपत्र/पदविका/पदवी (व्यावसायिक/तांत्रिक/सायन्स वगळून) लेखी परीक्षा रु. 130/- प्रती पेपर
ii. पदव्युत्तर पदवी आणि सर्व शिक्षणक्रम पदवी व्यावसायिक/तांत्रिक/सायन्सचे सर्व शिक्षणक्रम लेखी परीक्षा रु. 150/- प्रती पेपर
iii. प्रात्यक्षिक/व्हिवावोस (Viva) रु. 300/- प्रती पेपर
iv. मार्कशीट फि. रु. 100/- प्रती सेमिस्टर/ प्रती वर्ष
v. विलंब शुल्क Rs. 100/-

परीक्षा शुल्क जेवढे विषय नापास आहेत त्या सर्वांचे भरावे लागेल. परीक्षा अर्ज व शुल्क प्रत्येक नापास सेमिस्टर/वर्षासाठी भरावा लागेल. ऑनलाईन परीक्षा अर्ज भरताना Debit Card/Credit Card/Net Banking या मार्फत परीक्षा शुल्क भरता येईल.

**सर्व परीक्षार्थी, अभ्यासकेंद्र आणि विभागीय केंद्र यांनी वरील सूचनांची नोंद घ्यावी.**

परीक्षा नियंत्रक

प्रत — (1) विभागीय संचालक, य.च.म.मु.वि. सर्व विभागीय केंद्र — सर्व अभ्यासकेंद्रांना कळवावे.
(2) उपकुलसचिव, परीक्षा-1 आणि सहायक कुलसचिव, परीक्षा-2 आणि 3
(3) प्रमुख, संगणक कक्ष
(4) श्री. प्रेमनाथ सोनवणे, डेटा प्रोसेसिंग सुपरवाईजर — पोर्टलला प्रसिद्धीसाठी
5) प्रमुख, एम.के.सी.एल.- वरील प्रमाणे बदल करणेस

रमेश काय/सूचनापत्र